

**रत्नागिरी : आसमंत फाउंडेशनतर्फे या रोपांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.**

# आसमंत फाउंडेशनतर्फे रोपांचे वितरण

**रत्नागिरी, ता. २ :** येथील आसमंत बेनेवलन्स फाउंडेशनतर्फे विविध संस्था, शाळांच्या आवारात लावण्याकरिता औषधी व विविध प्रकारच्या वनस्पतींचे मोफत वितरण करण्यात येत आहे, अशी माहिती संस्थापक नंदकुमार पटवर्धन यांनी दिली. आसमंत फाउंडेशनतर्फे पिंपळ, कदंब, अर्जुन, टेट्ट, बहावा, औदुंबर, बेहेडा, हिरडा, पुत्रजीवी या प्रकारची झाडे दिली जाणार आहेत. आसमंत संस्था निसर्ग, पर्यावरण रक्षणासाठी गेल्या सात वर्षांपासून कार्यरत आहे. यंदा प्रथमच रोपांचे वितरण केले जात आहे. एमआयडीसी येथील आसमंत ट्री पार्कमध्येही दोन वर्षांत विविध प्रकारच्या देशी व औषधी वनस्पतींची लागवड केली आहे. ही झाडे आता मोठी होऊ लागली असून येथे अनेक प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात. ऑक्टोबरपासून मुलांसाठी पर्यावरण जागृतीसंदर्भात उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.